# शिक्षक / शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता

१) सर्वसाधारण सूचना

१. सर्व प्रकारचे मान्यता प्रसताव केवळ मान्यता शिबीरात स्वीकारले जातील व त्यावरील निर्णयही शिबिरात देण्यात येईल. मान्यता प्रस्तावाबाबत कार्यालयाशी केलेला पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. मान्यता घेण्याकरिता संबंधित प्राचार्य अथवा कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रमुख अथवा व्यवस्थापकीय कर्मचा-यांनीच प्रस्तावाचा पूर्ण अभ्यास करुन शिबिरास उपस्थित रहावे. संबंधित शिक्षकास पाठवून नये अथवा सोबत आणू नये.

३. एखादी नियुक्ती एखाद्या कारणास्तव अमान्य केली असल्यास त्या-त्या कारणांची रितसर पूर्तता झालेनंतरच परिपूर्ण प्रसताव मान्यतेसाठी फेरसादर करावा. आक्षेपाची / त्रृटींची पूर्तता न करताच अपुर्ण प्रस्ताव सादर करण्याचे टाळावे.

४. ज्या उच्च माध्यमिक शाळेत उच्च माध्यमिक कडील शिक्षक हेच मुख्याध्यापक पदावर कार्यरत असतील अशांना त्यांच्या विषयाचा ४ ते ६ घ.तास कार्यभार अध्यापनासाठी देणे आवश्यक आहे.

५. संसथा अल्पसंख्यांक / अल्पभाषिक म्हणून नोंदविली असेलेस त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

६. नियुक्ती सेवासमाप्ती प्रकरणी न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. सर्व नियुक्त्या शाळा समिती अथवा समन्वय समितीने करणे आवश्यक आहे व याबाबतचा ठराव सचिवाचे / प्राचार्याचे सहीने सादर करावा.

८. शासन निर्णय दिनांक २६/४/२००६ मधील तरतुदीनुसार अंशतः अनुदानीत विनाअनुदानीत / कायम विना अनुदानीत कार्यभारावर पूर्णवेळ / अर्धवेळ नियुक्ती ही वेतन श्रेणीतील राहील अशा शाळातील पदांना शिक्षण सेवक योजना लागू नाही.